# (६) कांकड आरती

कांकड आरती करीतों साईनाथ देवा ।
चिन्मयरूप दाखवीं घेऊनि बालक–लघुसेवा ।। धु० ।।

काम क्रोध मद मत्सर आटुनी कांकडा केला ।
वैराग्याचे तूप घालुनी मी तो भिजविला ।
साईनाथगुरूभक्तिज्वलनें तो मी पेटविला ।
तद्वृत्ती जाळूनी गुरूनें प्रकाश पाडीला ।
द्वैत–तमा नासूनी मिळवी तत्स्वरूपीं जीवा ।। चि० ।। १ ।।

भू–खेचर व्यापूनी अवघे हृत्कमलीं राहसी ।
तोचि दत्तदेव शिरडी राहुनी पावसी ।
राहूनी येथे अन्यत्रहि तू भक्तांस्तव धावसी ।
निरसुनिया संकटा दासा अनुभव दाविसी ।
न कळे त्वल्लीलाही कोण्या देवा वा मानवा ।।
चि० ।।२ ।।

त्वद्यशदुदुंभीने सारे अंबर हें कोंदलें ।
सगुण मूर्ति पाहण्या आतुर जन शिरडी आले ।
प्राशुनी त्वद्वचनामृत अमुचे देहभान हरपलें ।
सोडूनियां दुरभिमान मानस त्वच्चरणीं वाहिले ।
कृपा करूनियां साईमाउले दास पदरी घ्यावा ।।
चि० ।। का० ।। चि० ।।३ ।।